**पत्र**

प्रति,

अधिक्षक,
ससून सर्वोपचार रुग्णालय,
पुणे – ०१

जा.क्र. आस्था ३(१)/अनुकंपा-पोभ-२०१६/वै.त./२०१६ / 21359 पुणे दि.२/११/२०१६

**संदर्भ**:- या कार्यालयाचे पत्र क्र.आस्था-३(१)/अनुकंपा-पोभ/२०१६,दि.२६/१०/२०१६

**विषय** :- अनुकंपा पोलीस भरती – २०१६
निवड झालेल्या उमेदवारांची वैदयकीय तपासणी करणेबाबत..

---ooo---

या कार्यालयाच्या वतीने आयोजित केलेल्या पोलीस भरती- २०१६ मध्ये गुणवत्तेनुसार तात्पुरत्या स्वरुपात अंतिम निवड झालेले सोबतच्या यादीतील प्रत्येक उमेदवारांना आपल्या रुग्णलयात वैदयकीय तपासणी करणेकामी **दि.८-११-२०१६ रोजी** (६) **उमेंदवार दि. ९/११/२०१६ रोजी** (५) उमेदवार व तसेच **१०/११/२०१६ रोजी** (३) महिला उमेदवार पाठविण्यात येत आहे.

महाराष्ट्र पोलीस (सेवाप्रवेश) नियम २०११ मधील नियम ६ मध्ये नमुद केल्यानुसार उमेदवारांच्या वैदयकीय तपासणी संदर्भात महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्व साधारण शर्ती) नियम १९८१ मधील तरतुदी तसेच शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या तरतुदीनुसार वैदयकीय तपासणी करावी. शिवाय वैदयकीय चाचणीत दृष्टीदोष, तिरळेपणा रातआंधळेपणा, गुडघ्यास गुडघा लागणे, सपाट तळवे, त्वचा रोग, छातीचे रोग, एचआयव्ही इत्यादी वैदयकीय चाचण्याचा समावेश करणेबाबत विनंती आहे.

तसेच सदर पोलीस शिपाई हे वाहन चालविण्याचे कर्तव्य पार पाडण्यासाठी वैदयकीयदृष्टया पात्र आहेत किंवा नाही याबाबतचे अभिप्राय देखील कृपया नमुद करण्यात येवून, तसे वैदयकीय प्रमाणपत्र इकडील कार्यालयात पाठविण्यात यावे ही विनंती.

(श्रीराम अकोसकर)
प्रशारकीय अधिकारी
पोलीस आयुक्त, पुणे यांचेकरीता

प्रत,
पोलीस निरीक्षक, नियंत्रण कक्ष पुणे शहर
२/- सोबतच्या यादीतील उमेदवार यांना वर नमुद तारखेप्रमाणे उमेदवार सकाळी ०८.०० वाजता पोलीस आयुक्त, कार्यालय येथून सदर उमेदवार यांना रुग्णालयामध्ये घेवून जाणेकामी नियंत्रण कक्ष येथील **दि.८/११/२०१६ ते ९/११/२०१६** एक सहा.पोलीस फौजदार व **दि.१०/११/२०१६** एक महिला पोलीस कर्मचारी यांची नियुक्ती करावी. व वैदयकीय तपासणीची प्रमाणपत्रे इकडील कार्यालयास सादर करावी.